

# चला जाणून घेऊया आपली महानगरपालिका

## महिला व बालकल्याण विभाग

# महिला व बालकांची उन्नती केंद्रस्थानी

महाराष्ट्र सरकारने जून १९९३ मध्ये महिला व बाल विकास विभागाचा स्वतंत्र प्रशासकीय विभाग म्हणून शासनाने मंजुरी दिली. या विभागाअंतर्गत महिला व लहान मुलांचा विभाग आणि त्यांचा समाजात सहभाग वाढविणे, महिला व बाल गुन्हेगारी कमी करणे त्याचप्रमाणे त्यांच्या विरोधातील गुन्हे कमी करणे, कौशल्य विकासामधून महिलांचे सक्षमीकरण करणे, कुपोषण कमी करणे आणि स्त्रीभ्रूण हत्या कमी करणे या गोष्टी अंतर्भूत आहेत.

महिला व बाल विकास विभागाच्या हेच उद्दिष्टे पुढे ठेवून नागपूर महानगरपालिकेची महिला व बाल कल्याण समिती कार्यरत आहे. ही समिती नागपूर महानगरपालिकेच्या समाजकल्याण विभागाच्या अखत्यारीत येत असून समाजकल्याण अधिकारी महानगरपालिकेच्या उपायुक्त डॉ.रंजना लाडे या आहे. त्याचबरोबर महिला व बालकल्याण समिती सभापती म्हणून वर्षा ठाकरे तर उपसभापती श्रद्धा पाठक यांची नेमणूक करण्यात आली आहे. या समितीच्या अंतर्गत नागपूर शहरातील महिला व बालकांवरील होणार्या अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे स्व. अनुसूयाबाई काळे स्मृती महिला समुपदेशन केंद्र झोन क्र. १ ते १० मध्ये सुरू झाले आहे तसेच महानगरपालिका क्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी जीवन सुरक्षा प्रकल्प आरोग्य विमा योजना या समितीच्या मार्फत सुरू करण्यात आलेली आहे. ज्या कुटुंबाचे बी.पी.एल. यादीत नाव आहे असे कुटुंब. ज्यांच्याकडे पिवळी शिधापत्रिका असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे त्याचे उत्पन्न एक लाखापेक्षा कमी असावे आणि तो नागपूर शहराचा रहिवासी असल्याचा दाखला असावा, असे या योजनेचे पात्रता निकष आहे. याशिवाय या समितीअंतर्गत दिवाळी उद्योजिका मेळाव्याचे आयोजन, लाडली लक्ष्मी योजना, अपंग व्यक्तींना तीन चाकी सायकलचे वितरण,महिला उद्योजिका मेळावा, महिला व लहान मुलांचे आरोग्य तपासणी शिबीर, जागतिक महिला दिन, पिको फॉल मशीन वाटप, शालेय पोषण आहार, वृक्षारोपण यासारखे विविध उपक्रम वर्षभर राबविले जातात.

नागपूर महानगर पालिकेच्या समाजकल्याण विभाग आणि महिला व बाल कल्याण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्र शासन पुरस्कृत सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना शासनाने बंद करून त्याऐवजी राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान ही नवी योजना सुरू केली आहे. या योजनेचा उद्देश नागरी भागातील दारिद्र्य रेषेखालील यादीत नाव समाविष्ट असलेल्या नागरिकांकरिता राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान नागपूर महानगरपालिका अंतर्गत वैयक्तिक व्यवसायाकरिता कर्ज, महिलांचे बचत गट स्थापन करणे, बचत गटातील महिलांना सामूहिक व्यवसायाकरिता कर्ज, व नि:शुल्क कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार व स्वंयरोजगार उपलब्ध करून देण्यात येत असतात. बचत गटांनी तयार केलेल्या वस्तु विक्रीकरिता उपजीविका/आधार केंद्र या विभागाअंतर्गत तयार करण्यात येणार आहे.

महिला व बाल कल्याण समितीअंतर्गत महिलांचे व लहान मुलांचे सक्षमीकरण व्हावे व त्यांच्या उन्नतीला केंद्रस्थानी ठेवून नागपूर महानगरपालिकेची महिला व बालकल्याण समिती व समाजकल्याण विभाग कार्यरत असतो.



**वर्षा ठाकरे**
सभापती
महिला व बाल कल्याण विशेष समिती

नागपूर महानगर पालिकेच्या क्षेत्रातील नागपूर शहरातील सर्व महिला व बालकांपर्यंत समितीअंतर्गत चालविण्यात येणाऱ्या योजनेचा लाभ पोहचविण्यासाठी माझ्या समितीतील सर्व सदस्य हे कटीबद्ध असून महिलांच्या व मुलांच्या सक्षमीकरणासाठी आमची समिती तत्पर आहे.



**डॉ. रंजना लाडे**
उपायुक्त, मनपा, नागपूर.

महिला व बालके हा कुठल्याही शहरातील महत्त्वाचा घटक असतो. या घटकाच्या उन्नतीसाठी नागपूर महानगरपालिकेचा महिला व बालकल्याण विभाग कार्यरत आहे. महिलांना स्वयंपूर्ण करण्यासाठी अनेक योजना या विभागामार्फत राबविण्यात येतात. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत लाभ पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न असतो.














# आंतरराष्ट्रीय स्तरावरील दर्जेदार खेळाडू तयार करण्याचा ध्यास



क्रीडा, शारीरिक शिक्षण व युवक कल्याण विषयक उपक्रमांसाठी जागृती व्हावी व महाराष्ट्र राज्यात क्रीडा संस्कृतीचा वारसा जपला जावा व त्याचे संवर्धन व्हावे यासाठी जुलै १९७० मध्ये क्रीडा विभाग या स्वतंत्र संचालनालयाची निर्मिती असा शासनाचा प्रस्ताव तयार झाला. महाराष्ट्र राज्याचे स्वतंत्र क्रीडा धोरण असावे यासाठी शासनाने नगरपालिका स्तरावर त्याची व्याप्ती वाढवली.

नागपूर शहराच्या युवकांना, खेळाडूंना चालना मिळावी याकरिता महानगरपालिकेतही क्रीडा विभाग स्थापन करण्यात आलेला आहे. हा विभाग शिक्षण विभागाच्या अखत्यारीत येतो. नागपूर महानगरपालिकेच्या या विभागांतर्गत वर्षभर सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

नागपूर महोत्सव, खेळाडू व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा गौरव सोहळा व त्यांना मानपत्र देणे, थोर पुरूष जयंती उत्सव यासारखे मुख्य कार्यक्रम क्रीडा विभागाद्वारे वर्षभर चालविण्यात येतात.

खेड्यातील तसेच गरजू व गरीब खेळाडूंना प्रोत्साहन देणे तसेच पारंपरिक देशी खेळांना चालना मिळावी याकरिता राष्ट्रीय स्तरावरील खेळ स्पर्धाचे आयोजन महानगरपालिकेच्या अंतर्गत हा विभाग करीत असतो. यात मुख्यत्वे अखिल भारतीय कबड्डी स्पर्धा, अखिल भारतीय खो–खो स्पर्धा, ज्येष्ठ नागरिक वॉकथॉन स्पर्धा, बुद्धीबळ स्पर्धा, आंतरशालेय रात्रकालीन स्पर्धा, शरीर सौष्ठव स्पर्धा, बास्केट बॉल स्पर्धा, कुस्ती स्पर्धा, राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा समावेश येतो. त्याचप्रमाणे कवी संमेलन, मॅरॉथॉन स्पर्धा, कर्मचारी संघटना क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन या विभागामार्फत करण्यात येत असतात.

हा विभाग मनपाच्या शिक्षण विभागाच्या अंतर्गत असल्याने या विभागाद्वारे शालेय कार्यक्रम वर्षभर घेण्यात येत असतात. त्यात प्रामुख्याने शिक्षण सप्ताह, वंदे मातरम् गीत गायन स्पर्धा, शिक्षक दिन, बालक दिन, स्काऊट गाईड कॅम्प आदीचा समावेश आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या अखत्यारीत सद्यस्थितीत दोन मोठे स्टेडियम, पाच मोठे क्रीडा संकुल, पाच व्यायामशाळा येतात. यामध्ये खेळाडू प्रतिदिन सराव करीत असतात. यात यशवंत स्टेडियम, रा.पै. समर्थ स्टेडियम, राष्टसंत तुकडोजी महाराज क्रीडा संकुल, अग्याराम देवी चौक, विवेकानंद नगर बॅडमिंटन हॉल, महाल बॅडमिंटन हॉल, बडकस चौक, छत्रपती शिवाजी बॅडमिंटन हॉल, गणेश नगर स्केटींग रिंक, नंदनवन, शब्बानी व्यायामशाळा, रामराव अमृते व्यायामशाळा, सदर, समर्थ व्यायामशाळा प्रतापनगर, हनुमान व्यायाम शाळा भालदारपुरा, मारोतराव वस्ताद व्यायामशाळा सतरंजीपुरा आदींचा समावेश आहे. हे सर्व संकुल, व्यायामशाळा, स्टेडियम हे ‘ना नफा ना तोटा’ या तत्त्वावर महानगरपालिका चालवित आहे, हे येथे उल्लेखनीय.

नागपूर शहरातून दर्जेदार व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तयार व्हावे, हे स्वप्न बाळगूनच नागपूर महानगरपालिकेचा क्रीडा विभाग सदैव कार्यरत असतो.



**सभापती नागेश सहारे म्हणतात....**

नागपूर शहरातील गरीब खेळाडूंचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी महानगरपालिकेचा क्रीडा विभाग कटीबद्ध आहे. नागपूर शहर ही खेळाडूंची खाण आहे. या खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने त्यांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्यासाठी मनपा कटिबद्ध आहे. याबाबतचा एक ‘ॲक्शन प्लॅन’ लवकरच क्रीडा विभागाद्वारे तयार करण्यात येणार आहे.



**क्रीडा अधिकारी फारुख अहमद खान म्हणतात....**

नागपूर शहरातील खेळाडूंना योग्य प्रशिक्षण मिळावे याबाबत मनपाचा क्रीडा विभाग सदैव तत्पर असतो. मनपाच्या क्रीडा विभागातून आजवर राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू घडले आहेत. यापुढेही ते घडत राहीलच. प्रशासन व पदाधिकारी यांच्या समन्वयातूनच क्रीडा विभाग खेळाडूंसाठी आवश्यक त्या उपाययोजना राबवेल, असा मला विश्वास आहे.





# चला जाणून घेऊया आपली महानगरपालिका

## परिवहन विभाग

### शहरात स्मार्ट ट्रांसपोर्ट सुविधा देण्यासाठी कटीबद्ध

# नागपूरची 'आपली बस'

नागपूर शहराची वाहिनी म्हणून अल्पावधीत ओळख पावलेल्या 'आपली बस'ने नागपूरकरांच्या हृदयात स्थान निर्माण केले आहे. नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागातर्फे संचालित शहर बस सेवेचा हळूहळू होणारा विस्तार हा नागरिकांच्या विश्वासाची पावती आहे. वाढत्या वाहतूक समस्येवर तोडगा असलेली सार्वजनिक वाहतूक सेवा ही नागरिकांना अधिक सुविधायुक्त आणि समाधान देणारी करण्यासाठी मनपाचा परिवहन विभाग कटीबद्ध आहे. 'स्मार्ट परिवहन सेवा' म्हणून महाराष्ट्रात नावारूपास लवकरच येईल, याबाबत दुमत नाही.
प्रारंभी नागपूर शहर बस सेवा ही महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाद्वारे संचालित करण्यात येत होती. २००७ मध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने नागपूर शहर बस सेवा नागपूर महानगरपालिकेकडे सोपविली. स्टार बस पासून सुरू झालेला मनपाच्या शहर बस सेवेचा प्रवास आज 'आपली बस' आणि 'ग्रीन बस' पर्यंत येऊन पोहचला आहे.
नागपूर शहराची 'स्मार्ट सिटी' प्रकल्पात निवड झाली. सार्वजनिक वाहतूक सेवा हा स्मार्ट सिटी प्रकल्पातीलच एक भाग आहे. त्यामुळे ही सेवा अधिकाधिक सुकर आणि चांगली देण्याचा प्रयत्न मनपाच्या परिवहन समितीतर्फे सुरू आहे.

परिवहन क्षेत्रात नागपूर शहराची प्रगती ही वाखण्याजोगीच आहे. नागपूर शहरातील परिवहन विभागासाठी ९ फरवरी २००७ रोजी मे.वंश निमय इंफ्रास्टक्चर लिमिटेड या कंपनीला ऑपरेटर म्हणून नियुक्त केले. या ऑपरेटरअंतर्गत शहरात २३० बसेस विविध मार्गावर धावत होत्या. वाहतुकीच्या दृष्टीने ही बसेसची संख्या अपुरी पडत असल्याने ३ मार्च २०१० मध्ये नागपूर महानगरपालिका आणि वंश निमय यांच्यामध्ये पूरक करार करण्यात आला. या योजनेअंतर्गत २४० बसेस नव्याने परिवहन सेवेत दाखल झाल्या.

मार्च २०१७ मध्ये वंश निमय या ऑपरेटरसोबतचा करार संपुष्टात आला. आई.बी.टी.एम. या नव्या ऑपरेटरची नियुक्ती करण्यात आली. या ऑपरेटरअंतर्गत शहर बस वाहतूक सक्षम करण्याकरिता ३ डिझेल बस ऑपरेटर, आणि एक वातानुकुलित ग्रीन बस अशी यंत्रणा तयार करण्यात आली आहे. ही नवीन बस सुविधा 'आपली बस' म्हणून प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली. प्रारंभी १५ मिडी बसेस व ५५ वातानुकुलित बसेस सुरू करण्यात आल्या. सध्या प्रकल्पाअंतर्गत शहरात ४३२ डिझेल बसेस व ५५ वातानुकुलित ग्रीन बसेस असे मिळून एकूण ४८७ बसेस नागपूर शहरात धावत आहे.

नागपूर शहराला स्मार्ट ट्रांसपोर्टचा दर्जा मिळावा यासाठी नागपूर महानगर पालिकेचा परिवहन विभाग सदैव प्रयत्नरत असतो. या विभागाच्या विशेष समितीचे सभापती म्हणून जितेंद्र (बंटी) कुकडे, तर परिवहन व्यवस्थापक म्हणून शिवाजी जगताप हे शहराला स्मार्ट वाहतूक सुविधा देण्यासाठी तत्पर आहेत.

सन २०१७-१८ च्या परिवहन विभागाच्या अर्थसंकल्पात पंडित दीनदयाल उपाध्याय पथ अंत्योदय योजनेअंतर्गत शैक्षणिक सहल, क्रीडा स्पर्धा, विद्यार्थी व इतर घटकांना सवलत देण्याकरिता ५० लाख रुपयांची तरतूद प्रथमच करण्यात आली. भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी ज्येष्ठ नागरिक योजनेअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना यापुढे शहर बस सेवेअंतर्गत सवलत देण्यात येणार असून त्यासाठीही ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या तेजस्विनी योजनेअंतर्गत महिला स्पेशल बसेसही शहर बस सेवेअंतर्गत चालविण्यात येणार आहेत. ३० फूट व ६० फूट रस्त्यांकरिता मिनी बसेस व ६० फुटापेक्षा मोठ्या रस्त्यावर स्टॅण्डर्ड बसेस चालविण्याचा परिवहन विभागाचा मानस आहे. विशेष म्हणजे महानगरपालिकेतर्फे 'आपली बस' ॲप तयार करण्यात आले असून प्ले-स्टोअरमध्ये ते उपलब्ध आहे.

येणारी बस थांब्यावर कोणत्या वेळेत येईल, त्या बसमध्ये बसण्यासाठी जागा उपलब्ध आहे की नाही याची माहिती ॲपच्या माध्यमातून प्रवाशांना मिळू शकेल. प्रवाशांना होणारी गैरसोय टाळण्यासाठी तसेच तक्रारी नमूद करून त्यांचे निवारण करण्यासाठी लवकरच 'टोल फ्री' व 'व्हॉटस् अप' क्रमांक प्रत्येक बस व बस थांब्यावर प्रसारीत करण्यात येणार आहे. नियोजित व अस्तित्वात असलेल्या विविध बस थांब्याच्या बाजूच्या जागेवर कॅन्टीनकरिता जागा उपलब्ध करून प्रवाशांना चहा, पाणी व पॅकबंद पदार्थांची व्यवस्था करण्यात येईल. बस थांब्याची काळजी कॅन्टीन चालविणाऱ्याकडे राहील, अशीही भविष्यातील व्यवस्था असेल. शहराची सार्वजनिक वाहतूक ही लोकाभिमुख आणि स्मार्ट होण्याकरिता नागपूर महानगरपालिकेचा परिवहन विभाग कटीबद्ध आहे.





**बंटी (जितेंद्र) कुकडे**
सभापती परिवहन समिती

> नागपूर शहर हे सध्या स्मार्ट सिटीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. त्याप्रमाणे शहरातील जनतेसाठी सार्वजनिक वाहतूकही स्मार्ट करण्याचा परिवहन समितीचा प्रयत्न राहणार आहे. शहरातील सार्वजनिक वाहतूक सुलभ व नेटकी कशी करता येईल, याचा समिती विचार करेल.



**शिवाजी मधुकर जगताप**
परिवहन निरीक्षक, नागपूर महानगर पालिका

> येत्या वर्षभरात अनेक नवीन योजना कार्यान्वित करून स्मार्ट ट्रांसपोर्टची संकल्पना राबविण्यात येईल. नागपूर शहरांच्या नागरिकांनी स्वत:च्या दुचाकी, चारचाकी वाहनांचा वापर कमीत कमी करून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर जास्तीत जास्त करावा, ज्यामुळे रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी फुटेल आणि सुरक्षिततेला अधिक महत्त्व देता येईल.

परिवहन समिती

↓

आय.बी.टी एम. (उपकंत्राटदार)

↓

| दक्षता (आवक व निरीक्षण) | संचालक (बस वाहतूक फेऱ्या) | संयोजन व आय.टी.एस (बसमार्ग, थांबे, प्रसिद्धी फलक) |
|---|---|---|

↓

| | |
|---|---|
| बायोइथेनॉलवर चालणाऱ्या एकूण ५५ बसेस | सद्यस्थितीत २३७ जे.एन.एन.यू.आर.एम. बसेस |
| १५० नवीन मिडी बसेस | ४५ नवीन मिनी बसेस |

- आपलेपणाची आणि हक्काची जाणीव देणारी 'आपली बस'.
- २३७ बसेस, १५० मिडी बसेस, ४५ नवीन मिनी बसेस.
- ५५ ग्रीन वातानुकुलित बसेस.
- तेजस्विनी योजनेअंतर्गत महिलांसाठी स्पेशल बसेस
- ज्येष्ठ नागरिकांना सवलत, विद्यार्थ्यांनाही सवलत
- शैक्षणिक सहल, क्रीडा स्पर्धा व इतर सवलतीसाठी ५० लाखांची तरतूद
- 'आपली बस' ॲप आणि तक्रारींसाठी 'व्हॉटस् अप' क्रमांक लवकरच